18 JAN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराय नसते, तर माझे नाव दुसरेच असते

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे वक्तव्य

कोल्हापूर, ता. १७ : 'छत्रपती शिवाजी महाराज नसते, तर माझे, आपले नाव दुसरेच काही तरी असते. मी आज सी. पी. राधाकृष्णन म्हणून येथे उभा नसतो', असे वक्तव्य राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभात केले.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले, 'कोल्हापूर ही देवी अंबाबाईची पवित्र भूमी आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाला उपस्थित राहताना मला खूप आनंद होत आहे. या विद्यापीठाला



राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन.

दिलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव आणि विद्यापीठ परिसरात स्थापित केलेला महाराजांचा सुंदर पुतळा त्यांच्या शौर्यपूर्ण जीवनाची आठवण करून देतो. मी फक्त सहा वर्षांचा असताना शिवाजी महाराजांच्या जीवनाबद्दल शिकलो. त्यांचे बंधू व्यंकोजी हे तंजावरला होते. त्यामुळे शिवाजी महाराजांनी वेल्लोर, तंजावर, गिंजी (सेनजी) आणि तमिळनाडूतील इतर काही ठिकाणी भेट दिली होती. ते ऐकून आम्हाला अभिमान वाटला. परदेशी आक्रमकांच्या विरोधात त्यांनी सातत्याने लढा दिला.

### तुम्ही भाग्यवान वारसदार आहात

राज्यपाल म्हणाले, 'कोल्हापूर ही महान शासक छत्रपती शाहू महाराजांची भूमी आहे, जे देशभरात शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी, विशेषतः सामाजिक - आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समुदायांमध्ये प्रगतिशील धोरणांसाठी ओळखले जातात. त्यामुळे तुम्ही धैर्य, सामाजिक न्याय आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्टतेच्या महान वारशाचे भाग्यवान वारसदार आहात.'

### कोल्हापुरात उत्कृष्ट क्रीडा केंद्र असावे

■ 'कोल्हापूरमध्ये शेती, उद्योग, आरोग्यसेवा, शिक्षण आणि इतर क्षेत्रांमध्ये विकासाची प्रचंड क्षमता आहे. राजर्षी शाहू महाराजांनी क्रीडा क्षेत्राला विशेषतः कुस्तीला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले. कोल्हापूरमध्ये उत्कृष्ट क्रीडा केंद्र आणि जागतिक दर्जाचे शूटिंग रेंज असावे', अशी अपेक्षा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केली.

स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# शिवाजी महाराज नसते तर मी सी. पी. राधाकृष्णन नसतो!

## दीक्षांत समारंभात राज्यपालांचे वक्तव्य

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मी सहा वर्षांचा असताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाबद्दल शिकलो. छत्रपती शिवाजी महाराजांनी वेल्लोर, तंजावर, जिंजी (सेनजी) आणि तामिळनाडूतील इतर काही ठिकाणी भेट दिली होती हे ऐकून अभिमान वाटला. खरे तर छत्रपती शिवाजी महाराज नसते तर मी आज येथे सी. पी. राधाकृष्णन म्हणून उभा नसतो. कोणत्या तरी वेगळ्या नावाने माझी ओळख असती, असे वक्तव्य राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी शुक्रवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. राधाकृष्णन म्हणाले, सोशल इंजिनिअरिंगचा प्रयोग हा स्वातंत्र्यापूर्वी महाराष्ट्रातील कोल्हापूर संस्थानात झाला. स्वातंत्र्यानंतर सरकारांनी त्याची अंमलबजावणी आपल्या धोरणांत केली. हे राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचे मोठेपण आहे. शिवाजी विद्यापीठाला दिलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव आणि विद्यापीठ परिसरात स्थापित केलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा सुंदर पुतळा छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यपूर्ण जीवनाची आठवण करून देतो. मी सहा वर्षांचा असताना छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनचरित्र ऐकले. त्यांचे बंधू व्यंकोजी हे तंजावरला होते. त्यामुळे महाराजांनी वेल्लोर, तंजावर, जिंजी (सेनजी) आणि तामिळनाडूतील इतर काही ठिकाणी भेट दिली होती याचा अभिमान आहे.



छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज मी तुमच्यासमोर सी. पी. राधाकृष्णन म्हणून उभा नसतो. कोणते तरी वेगळे नाव मला असते. शिवाजी महाराज हे केवळ महाराष्ट्राचे राजे नव्हते तर ते अखंड भारताचे महाराजे होते, अशा शब्दांत राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जाज्वल्य पराक्रम व जीवनकार्याचा गौरव केला.

## १८ विद्यार्थ्यांनी मिळवली पारितोषिके





# शिस्त, कष्ट, प्रामाणिकपणातून यशस्वी व्हा

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन : शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

### शाहूंचा गौरव, हवी जागतिक दर्जाची शूटिंग रेंज

### ३८ पीएच.डी., तर ४० पारितोषिके प्रदान

### उत्कृष्टतेचा मानदंड

### विज्ञान, तंत्रज्ञान विषयावर सर्वाधिक संशोधन

## छत्रपती शिवाजी महाराज नसते तर माझे नाव दुसरे असते : राज्यपाल

लोकमत न्यूज नेटवर्क

## विद्यार्थ्यांनी मिरवल्या पदव्या

## ऑनलाइन पद्धतीने २००० हून अधिक जणांचा सहभाग

# जगातील समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घ्या

### डॉ. आशिष लेले : नवोपक्रमच यशाची पायरी


लोकमत न्यूज नेटवर्क



### धैर्याने आणि दृढ निश्चयाने पुढे जा







मस्ट READ

# पदवीसोबत विद्यार्थ्यांनी ग्रंथही नेले सोबत

लोकमत न्यूज नेटवर्क

### स्नातकांना डिजीलॉकरवर उपलब्ध



# तरुण भारत
संवाद

कोल्हापूर दिनांक जिल्हा




प्रशासनाकडून दीक्षांत सोहळ्याचे नेटके नियोजन : पदवी स्वीकारल्यानंतर विद्यार्थ्यांचा जल्लोष : पदवी प्रमाणपत्रे [illegible]

# दीक्षांत समारंभाला यात्रेचे स्वरुप









पुण्य नगरी

# केवळ पदवीधर नाही, तर नवकल्पना आणि प्रगतीचे तुम्ही दूत

## ज्येष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. आशीष लेले; शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत सोहळा उत्साहात

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठासारख्या महान संस्थेकडून मिळणाऱ्या शिक्षण आणि कौशल्यांनी सुसज्ज होऊन बाहेरच्या जगात पाऊल ठेवत आहात. यावेळी तुम्ही लक्षात ठेवा की, तुम्ही फक्त पदवीधर नाही, तर बदलाचे, नवोपक्रमाचे आणि प्रगतीचे राजदूत आहात, असे प्रतिपादन पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक, ज्येष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. आशीष लेले यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. यावेळी राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन आणि उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, खासदार श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांची उपस्थिती होती.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यात बोलताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. आशीष लेले. सोबत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आदी. (छाया : पांडुरंग पाटील)

डॉ. आशीष लेले म्हणाले, विद्यापीठाने परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण आणि कौशल्ये प्रदान करण्याचे उल्लेखनीय काम केले. ज्ञान, कौशल्ये आणि स्वतंत्र दृढविश्वास ठेवून जगात पाऊल ठेवताना हे जाणून घ्या की, भविष्य घडवायचे आहे.

राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन म्हणाले, शिक्षणाने प्रामाणिकपणा, करुणा व टीकात्मक विचारसरणीसारखे गुण जोपासले पाहिजेत. विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने व कृपेने जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार केले पाहिजे. कोल्हापूर ही महान शासक राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची भूमी आहे, जे देशभरात शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी, विशेषतः सामाजिक- आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समुदायांमध्ये प्रगतिशील धोरणांसाठी ओळखले जातात.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात तुमच्यासोबत उपस्थित राहताना खूप आनंद होत आहे. विद्यापीठाला दिलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव व विद्यापीठ परिसरात स्थापित केलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा सुंदर पुतळा छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यपूर्ण जीवनाची आठवण करून देतो. आज ६३ वर्षांनंतर शिवाजी विद्यापीठात २९१ संलग्न महाविद्यालये आहेत आणि विद्यार्थ्यांची संख्या २.५ लाखांपर्यंत पोहोचली आहे.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने आपल्या हीरकमहोत्सवी वाटचालीमध्ये गुणवत्ता आणि शैक्षणिक उत्कृष्टतेचा मानदंड प्रस्थापित केला आहे. विविध मूल्यांकन करणाऱ्या संस्थांनीही शिवाजी विद्यापीठाचे देशातील सातत्याने उंचावत असलेले स्थान अधोरेखित केले आहे.

संशोधकांनी गेल्या सहा महिन्यांत २५ हून अधिक पेटंट मिळवले आहेत. यातून विद्यापीठातील उच्च दर्जाच्या संशोधनावर शिक्कामोर्तब झाले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या पीएम-उषा अभियानांतर्गत विद्यापीठ सक्षमीकरणासाठी विद्यापीठास २० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. सरासरी १५ दिवसांच्या आत परीक्षांचे निकाल जाहीर करण्याची विक्रमी कामगिरी विद्यापीठ मागील तीन सत्रांत सातत्याने करत आहे.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी वार्षिक अहवाल सादर केला. आभार कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी मानले. यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, महापालिका आयुक्त के. मंजुलक्ष्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आदी उपस्थित होते. कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

18 JAN 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभात शुक्रवारी बोलताना राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक प्रा. डॉ. आशिष लेले. समोर उपस्थित विद्यार्थी, शिक्षक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर.
(मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

# तुम्ही स्वतः बदलाचे प्रतिनिधी व्हा

## शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात प्रा. डॉ. आशीष लेले यांचे आवाहन

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : हवामान बदल, सामाजिक असमानता अशी विविध आव्हाने, समस्यांना सध्या जग तोंड देत आहे. या गुंतागुंतीच्या समस्या तुमच्यापैकी अनेकांना सोडवण्यासाठी नेतृत्व करावे लागेल. कारण, तुम्ही केवळ पदवीधर नाही; तर बदल, नावीन्य, प्रगतीचे राजदूत आहात. तुमच्यामध्ये समाधानाचा भाग आणि स्वतःसह सभोवतालच्या जगात सकारात्मक बदल घडवून आणण्याची क्षमता आहे. त्यामुळे तुम्ही स्वतः बदलाचे प्रतिनिधी व्हा, असे आवाहन पुणे येथील राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक प्रा. डॉ. आशीष लेले यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

पान ११ वर >>

### नवपदवीधरांना प्रा. लेले यांनी दिला यशाचा मंत्र

- नेहमी तीन 'पी' लक्षात ठेवा- पर्पज (उद्देश), पर्सिव्हर्न (चिकाटी), पॅशन (आवड)
- स्वप्नांचे जीवन जगण्यासाठी पुरेसे धाडसी व्हा
- ध्येय निश्चित करा आणि ते साध्य करण्यासाठी योजना तयार करा
- मूल्यांना, प्रामाणिकपणाला आणि उत्कृष्टतेसाठी अत्यंत दृढपणे वचनबद्ध राहा
- यशाची पायरी म्हणून अपयशाला स्वीकारा
- भविष्यातील अनिश्चिततेला धैर्य, दृढनिश्चयाने सामोरे जा
- स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवा, आवडींचे अनुसरण करा
- तुमच्या आतील अविश्वसनीय क्षमतेला विसरू नका

# तुम्ही स्वत: बदलाचे प्रतिनिधी व्हा

> पान १ वरून

अध्यक्षस्थानी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, तर उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील प्रमुख उपस्थित होते. राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात झालेल्या या समारंभात जयसिंगपूर येथील बंडू राजू कोळी याला सर्वसाधारण कौशल्यासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदक, तर मडगाव येथील क्रिशा अल्डा नोरोन्हा हिला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते एम. ए. मानसशास्त्र विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दलचे कुलपती सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले. उत्साही वातावरणात पार पडलेल्या या समारंभात एकूण ५९,४९२ स्नातकांना पदवी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

प्रा. डॉ. लेले म्हणाले, जगाला भेडसावणाऱ्या समस्या एकटी व्यक्ती सोडवू शकत नाहीत. त्यांना अनेक संस्था, अनेक विषयांमधील अत्यंत कार्यक्षम टीमवर्कची आवश्यकता आहे. आजच्या हवामान बदल किंवा जागतिक युद्धांसारख्या आव्हानांमुळे अनेकदा सामाजिक-आर्थिक विषमता निर्माण होतात. म्हणूनच, ही आव्हाने कमी करण्यासाठी मानव्यशास्त्र, सामाजिक विज्ञान, कायद्यातील पदवीधरांना विज्ञान आणि अभियांत्रिकीतील पदवीधरांइतकीच महत्त्वाची भूमिका बजावावी लागेल. या समस्यांवरील आपले उपाय शाश्वत असावेत. ते शोधण्यात तंत्रज्ञान, शाश्वत डिझाइन विचारसरणी, नवोपक्रम कळीची भूमिका बजावेल. तुमच्यापैकी प्रत्येकामध्ये एक छुपा नवोपक्रमकर्ता आहे. त्या उद्यमशीलतेला चालना द्या.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले, राष्ट्रीय शिक्षण धोरणातून २०३६ पर्यंत आपल्या उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये एकूण नोंदणी प्रमाण ५० टक्के साध्य करण्याचे ध्येय आहे. त्यामुळे विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांनी



कोल्हापूर : दीक्षान्त समारंभात शुक्रवारी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते बंडू कोळी याला राष्ट्रपती सुवर्णपदक, तर क्रिशा अल्डा नोरोन्हा हिला कुलपती सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. शेजारी डावीकडून डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. डॉ. आशीष लेले, चंद्रकांत पाटील, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. अजितसिंह जाधव.

## यंदाचा दीक्षान्त समारंभ दृष्टिक्षेपात

- प्रदान केलेल्या एकूण पदवी प्रमाणपत्रांची संख्या - ५१,४९२
- विद्यापीठ प्रांगणात प्रदान केलेली प्रमाणपत्रे - १४,२६९
- पोस्टाने वितरित केली जाणारी प्रमाणपत्रे - ३७,२३३

## 'उच्चशिक्षणातील विद्यार्थिनींचा टक्का वाढला'

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री पाटील म्हणाले, शासनाने उच्चशिक्षणाच्या क्षेत्रातील ग्रॉस एनरॉलमेंट रेशो वाढवून पुढील दहा वर्षांत तो ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट बाळगले आहे. त्यासाठी शासनाने आठ लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबातील विद्यार्थिनींना शैक्षणिक शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने उच्चशिक्षणातील विद्यार्थिनींचा टक्का वाढला आहे.

गुणवत्ता, उत्कृष्टता राखून संख्यात्मक विस्तार करण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार केले पाहिजे.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री पाटील म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र हे देशात, तर शिवाजी विद्यापीठ राज्यात अग्रेसर आहे. विद्यापीठाचा सुवर्णमहोत्सव निधीचा अनुशेष बऱ्यापैकी भरून निघाला आहे. विद्यार्थ्यांनी नेहमीच नवे विचार, तंत्रज्ञान स्वीकारून प्रगतीची शिखरे गाठावीत.

या कार्यक्रमात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी विद्यापीठाचा वार्षिक अहवाल मांडला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पदव्यांची माहिती दिली. यावेळी खासदार शाहू छत्रपती, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., महापालिकेच्या प्रशासक के. मंजूलक्ष्मी आदी मान्यवर उपस्थित होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. नंदिनी पाटील, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले.

### विद्यापीठाशी 'सीएआयआर'चे बंध मजबूत करणार

डॉ. लेले म्हणाले, शिवाजी विद्यापीठ या प्रदेशातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उत्कृष्टतेचे दीपस्तंभ बनले आहे. माझ्या नॅशनल केमिकल लॅबोरेटरी (सीएसआयआर) यांचे शिवाजी विद्यापीठाशी दीर्घकालीन संबंध आहेत. हे बंध अनेक पटीने मजबूत करण्याची आमची अपेक्षा आहे.

### अठरा जणांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण

या समारंभात प्रमुख मान्यवरांच्या हस्ते व्यासपीठावर एकूण १८ विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. त्यात कोळी, नोरोन्हा यांच्यासह आरती सर्वा, साईसिमरन घाशी, आस्था ओगले, धीरज पोळ, पूजा पाटील, प्रथमेश कोले, गौरी राक्षे, आयेशा बागवान, शीतल पाटील, ऋतुजा परीट, व्ही. एस. बिंधुजा, अश्विनी तेली, संतोष वसेकर, मेहक हुदलीकर, वैष्णवी लाड, सौरवी कुरणे यांचा समावेश होता. याशिवाय चाळीस पीएच.डी.धारकांसोबत व्यासपीठावर एकत्रित छायाचित्र घेण्यात आले.

### दोन हजार जणांचा 'ऑनलाईन' सहभाग

या समारंभाचे विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' यूट्यूब वाहिनीवरून थेट प्रक्षेपण करण्यात आले. त्याच्या माध्यमातून या समारंभात सुमारे दोन हजार जण ठिकठिकाणांहून सहभागी झाले.

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# विद्यार्थ्यांनो, प्रामाणिकपणा, कष्ट, स्वयंशिस्त, निष्ठेतून यशस्वी व्हा

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन : शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर ही महान शासक राजर्षी शाहू महाराज यांची भूमी आहे. येथे शेती, उद्योग, आरोग्यसेवा, शिक्षण आणि इतर क्षेत्रांमध्ये विकास करण्याची प्रचंड क्षमता आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनो, स्वयंशिस्त, कष्ट, प्रामाणिकपणा व कामावरील निष्ठा या चतु:सूत्रीचा अवलंब करत जीवनात यशस्वी व्हा, असा कानमंत्र कुलपती तथा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी शुक्रवारी दिला.

शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. विद्यापीठातील राजमाता जिजाऊ सभागृहात झालेल्या समारंभास पुण्याच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक डॉ. आशिष लेले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांची विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी जैव रसायनशास्त्र अधिविभागातील बंडू राजू कोळी यांना 'राष्ट्रपती सुवर्णपदक,' पान २ वर ▸




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभात 'राष्ट्रपती सुवर्णपदक' बंडू राजू कोळी यांना, तर 'कुलपती पदक' क्रिशा अल्दा नोरोन्हा यांना प्रदान करताना कुलपती तथा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन. सोबत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा पुणेचे संचालक डॉ. आशिष लेले, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव. (छाया : पप्पू अत्तार)

### ३८ पीएच.डी., तर ४० पारितोषिके विद्यार्थ्यांना प्रदान

दीक्षान्त समारंभात ३८ स्नातकांना व्यासपीठावर पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्याचबरोबर ४० पारितोषिके विद्यार्थ्यांना देऊन सन्मानित करण्यात आले. यात विविध विषयांत प्रावीण्यप्राप्त विद्यार्थी, स्मृती पारितोषिके, पदवी परीक्षेत सर्वाधिक गुण मिळणारे व प्रथम क्रमांक संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्याशिवाय १४ हजार २६९ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेतले. ३७ हजार २२३ विद्यार्थ्यांना पोस्टाद्वारे पदवी प्रमाणपत्र पाठवले जाणार आहे.

18 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कष्ट, शिस्त अन् प्रामाणिकपणाने यशस्वी व्हा

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् : शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी विविध क्षेत्रांमध्ये महान कार्य केले आहे. त्यांच्या या महान भूमीचे, विचारांचे तुम्ही वारसदार आहात. कोल्हापूरमध्ये शेती, उद्योग, आरोग्यसेवा, शिक्षण आणि इतर क्षेत्रांमध्ये विकासाची प्रचंड क्षमता आहे. त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन विद्यार्थ्यांनी शिस्त, कष्ट, प्रामाणिकपणाचा अवलंब करून यशस्वी व्हावे, असे प्रतिपादन राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन् यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील ६१ व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षांत समारंभात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांच्या हस्ते कुलपती सुवर्णपदक स्वीकारताना क्रिशा नोरोन्हा. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आशिष लेले, मंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. अजितसिंह जाधव.

दीक्षांत समारंभात बंडू कोळी याला राष्ट्रपती सुवर्णपदक तर क्रिशा नोरोन्हा हिला कुलपती सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले. ३८ पीएच. डी. पदवी, १६ विशेष पारितोषिक देऊन स्नातकांना गौरवण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा संचालक डॉ. आशिष लेले उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन् म्हणाले, विद्यापीठाच्या नावासह छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा त्यांच्या शौर्याची आठवण करून देतो. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची कोल्हापूर भूमी देशभरात शिक्षण, सामाजिक-आर्थिकदृष्ट्या प्रगतीशील धोरण अवलंबण्यासाठी ओळखली जाते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने आव्हानांना तों[ड] देण्यासाठी तयार केले पाहिजे. शिवाजी विद्यापीठ उत्कृष्टते[चा] वारसा कायम ठेवेल.

पान ९ पह

### जागतिक दर्जाच्या शूटिंग रेंजची गरज

राजर्षी शाहू महाराजांनी क्रीडा क्षेत्राला विशेषतः कुस्तीला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले. कोल्हापूरमध्ये उत्कृष्ट क्रीडा केंद्र आणि जागतिक दर्जाचे शूटिंग रेंज असावे, असे मत राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन् यांनी व्यक्त केले.

# कष्ट, शिस्त अन् प्रामाणिकपणाने यशस्वी व्हा

पान १ वरून

तसेच समाजाच्या प्रगतीत योगदान देत राहील, असा विश्वास राधाकृष्णन् यांनी व्यक्त केला.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठ काळानुसार तांत्रिक बदल स्वीकारत आहे. अनेक अभ्यासक्रम सुरू करून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी मिळवून दिल्या आहेत. पीएम उषा योजनेअंतर्गत विद्यापीठाला २० कोटी रूपये अनुदान मंजूर केले आहे. नवीन शैक्षणिक धोरण राबवण्यात शिवाजी विद्यापीठ राज्यात अव्वल आहे. कौशल्याधिष्टीत शिक्षण घेणाऱ्या मुलींचे शुल्क राज्य शासन भरत आहे. ही खूप मोठी विद्यार्थिनींसाठी मदतच म्हणावी लागेल. आता हीरकमहोत्सवी वर्षाकडे विद्यापीठ वाटचाल करीत असून या वर्षातही विद्यापीठाला अनुदान दिले जाईल, असे आश्वासन देत भुयारी मार्गाच्या कामाचे कौतुक केले.

डॉ. आशिष लेले म्हणाले, पदवीदान प्रदान हा यशस्वी करिअर घडविण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या समर्पण, त्याग आणि कठोर परिश्रमाचा उच्चबिंदू आहे. हवामान बदलामुळे जागतिक साथीच्या आजारांपासून ते दुर्गम आरोग्यसेवा अशा अभूतपूर्व आव्हानांना जग तोंड देत आहे. या समस्या गुंतागुंतीच्या असून जागरूक राहण्याची आवश्यकता आहे. आजच्या जगाला भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी कार्यक्षम टीमवर्कची आवश्यकता आहे. धैर्याने आणि दृढनिश्चयाने पुढे जा. तुमचे ध्येय निश्चित करा आणि ते साध्य करण्यासाठी योजना तयार करा. मार्ग सापडत नसेल, तर नवीन मार्ग तयार करा. तुमच्यासाठी संधींचे दरवाजे सहज उघडत नसतील तर स्वतःचे दरवाजे तयार करा, असे आवाहनही डॉ. लेले यांनी विद्यार्थ्यांना केले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठाला नॅक कडे एप्लसप्लस मानांकन मिळाल्यामुळे अनेक संशोधन प्रकल्प विद्यापीठाला व संशोधकांना मिळाले. एनआयआरएफ रँकिंगमध्ये ५१ ते १०० बँडमध्ये स्थान प्राप्त केले आहे. ब्रिक्स देशांच्या दक्षिण आशियाई देशांत १८७ वे स्थान मिळवले आहे. ए. डी. सायंटिफिक क्रमवारीत ९६ संशोधक आहेत. विद्यापीठात वारंवार बदलत्या तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना अद्ययावत शिक्षण देण्याचा प्रयत्न शिवाजी विद्यापीठ सातत्याने करत असल्याचे त्यांनी सांगितले.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पदवी प्रमाणपत्राबद्दल माहिती दिली. सूत्रसंचालन नंदिनी पाटील आणि धैर्यशील यादव यांनी केले. आभार कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मानले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, खासदार शाहू छत्रपती, जिल्हा बँकेचे संचालक प्रताप उर्फ भैय्या माने, अधिष्ठाता, अधिकार मंडळाचे सदस्य, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कष्ट, शिस्त अन् प्रामाणिकपणाने यशस्वी व्हा

## राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् : शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ उत्साहात

प्रतिनिधी

कोल्हापूर

छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी विविध क्षेत्रांमध्ये महान कार्य केले आहे. त्यांच्या या महान भूमीचे, विचारांचे तुम्ही वारसदार आहात. कोल्हापूरमध्ये शेती, उद्योग, आरोग्यसेवा, शिक्षण आणि इतर क्षेत्रांमध्ये विकासाची प्रचंड क्षमता आहे. त्यांच्या विचारांचा वारसा घेऊन विद्यार्थ्यांनी शिस्त, कष्ट, प्रामाणिकपणाचा अवलंब करून यशस्वी व्हावे, असे प्रतिपादन राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन् यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील ६१ व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षांत समारंभात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांच्या हस्ते कुलपती सुवर्णपदक स्वीकारताना क्रिशा नोरोन्हा. सोबत डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आशिष लेले, मंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. अजितसिंह जाधव.

दीक्षांत समारंभात बंडू कोळी याला राष्ट्रपती सुवर्णपदक तर क्रिशा नोरोन्हा हिला कुलपती सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले. ३८ पीएच. डी. पदवी, १६ विशेष पारितोषिक देऊन स्नातकांना गौरवण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा संचालक डॉ. आशिष लेले उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन् म्हणाले, विद्यापीठाच्या नावासह छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा त्यांच्या शौर्याची आठवण करून देतो. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची कोल्हापूर भूमी देशभरात शिक्षण, सामाजिक-आर्थिकदृष्ट्या प्रगतीशील धोरण अवलंबण्यासाठी ओळखली जाते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार केले पाहिजे. शिवाजी विद्यापीठ उत्कृष्टतेचा वारसा कायम ठेवेल.

### जागतिक दर्जाच्या शूटिंग रेंजची गरज

राजर्षी शाहू महाराजांनी क्रीडा क्षेत्राला विशेषत: कुस्तीला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले. कोल्हापूरमध्ये उत्कृष्ट क्रीडा केंद्र आणि जागतिक दर्जाचे शूटिंग रेंज असावे, असे मत राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन् यांनी व्यक्त केले.

पान ९ पहा

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

## दीक्षान्त समारंभ




**पदवी प्रमाणपत्र इथे मिळेल...** पदवी प्रमाणपत्र वितरणासाठी मांडण्यात आलेल्या बूथ क्रमांकाचा मेसेज पाहताना विद्यार्थिनी.



**पुस्तकात रमल्या मैत्रिणी...** ग्रंथ प्रदर्शनात स्टॉलवरील पुस्तक न्याहाळताना विद्यार्थिनी.



**हाच तो कॅम्पस...** शिवाजी विद्यापीठाचा कॅम्पस विद्यार्थ्यांना नेहमीच प्रेरणा देतो. पदवी प्रमाणपत्रासोबत विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या छायेत काही क्षण व्यतीत करण्याचा आनंद तर काही औरच. त्यामुळे विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या साक्षीने आवारात झालेली विद्यार्थ्यांची गर्दी

शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षान्त समारंभ शुक्रवारी झाला. पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्साहाने विद्यापीठ कॅम्पसमध्ये तजेला निर्माण झाला. येथील ग्रंथ प्रदर्शनाला भरभरुन प्रतिसाद मिळाला. पदवी प्रमाणपत्रासह फोटो, सेल्फी घेत विद्यार्थ्यांनी हा आयुष्यातील महत्त्वाचा क्षण कॅमेऱ्यात कैद केला. दीक्षान्त समारंभप्रसंगी विद्यापीठ आवारातील मूड टिपले आहेत छायाचित्रकार पप्पू अत्तार यांनी.




**सेल्फी झाली क्लिक...** पदवी प्रमाणपत्र मिळाल्याचे समाधान आणि मित्र-मैत्रिणी भेटल्याचा आनंद असा सेल्फी क्लिकने अधिकच दुणावला.





**ग्रंथ प्रदर्शनाचे दालन गजबजले...** दीक्षान्त समारंभानिमित्त आयोजित ग्रंथ प्रदर्शनाला विद्यार्थी, प्राध्यापक यांसह सर्व अतिथींनी भेट दिली. प्रदर्शनात झालेली गर्दी.

लोकमत













१) शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभात शुक्रवारी पदवी मिळविलेल्या मुलींनी असा जल्लोष केला. २) पदवी मिळालेल्या विद्यार्थिनींचा आनंद गगनात मावत नव्हता. त्यात ही पदवी पहिल्यांदाच मराठी व इंग्रजी अशा द्विभाषिक स्वरूपात दिल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. ३) शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभात शुक्रवारी पदवी प्रमाणपत्र घेतल्यानंतर या विद्यार्थ्याला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर सेल्फी घेण्याचा मोह आवरला नाही. ४) शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षान्त समारंभात शुक्रवारी मंदाकिनी कदम या महिलेने राज्यशास्त्राची पदवी घेतल्यानंतर त्यांना पदवी प्रमाणपत्रासह फोटो घेण्याचा मोह आवरला नाही. **छाया : आदित्य वेल्हाळ**

पुढारी

# MY कोल्हापूर

शनिवार, १८ जानेवारी २०२५

# उत्साह अन् अभिमानाने बहरला शिवाजी विद्यापीठ कॅम्पस



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभानंतर पदवी प्रमाणपत्र उंचावून विद्यार्थ्यांनी आनंदाने अशी झेप घेतली. (छाया : पप्पू अत्तार)

## पदवी प्रमाणपत्रासह क्षण कॅमेऱ्यात कैद; मैत्रभेटीने उजळल्या कॉलेजमधील आठवणी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

उच्च शिक्षणाचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण केल्यानंतर पदवी प्रमाणपत्र हातात घेतानाचा क्षण मनाच्या कप्प्यात साठवणाऱ्या तरुणाईच्या उत्साह, आनंद अन् अभिमानाने शुक्रवारी शिवाजी विद्यापीठ कॅम्पस बहरला. सकाळपासून विद्यापीठाच्या निसर्गरम्य कानाकोपऱ्याने विविध विद्या शाखांमधील विद्यार्थ्यांच्या चैतन्यदायी सहवासाची अनुभूती घेतली. पदवी प्रमाणपत्र मिळाल्याचा क्षण कॅमेऱ्यात कैद करणारे तरुणाईचे ग्रुप, आई-वडिलांना पदवी प्रमाणपत्र दाखवणारे व्हिडीओ कॉल्स, प्रमाणपत्रातील शब्द वाचणारी कुतूहलाची नजर आणि भविष्यातील स्वप्नांचा वेध घेणाऱ्या डोळ्यातील बोलके भाव अशा वातावरणाने शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणालाही तारुण्याची झालर मिळाली. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षांत समारंभाचे.

शुक्रवारी सकाळी दहा वाजल्यापासूनच शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीकडे येणारे कॅम्पसमधील रस्ते तरुणाईने फुलून गेले. कोल्हापूर, सांगली, सातारा अशा विविध भागांतील विद्यार्थी प्रमाणपत्रे स्वीकारण्यासाठी दाखल होत होते. ग्रुप करून तरुणाई जिजाऊ सभागृहाकडे येत होती. आज पदवी मिळणार ही भावना प्रत्येकाच्या चेहऱ्यावरील चमक वाढवणारी दिसत होती. विविध विद्या शाखांच्या पदवी, पदव्युत्तर आणि संशोधनाची पदवी प्रमाणपत्रे स्वीकारताना विद्यार्थ्यांचा ओसंडून वाहणारा उत्साह, मित्र-मैत्रिणींसोबत साजरा केला जाणारा आनंदोत्सव, प्रमाणपत्रासह हा क्षण कॅमेऱ्यात टिपण्यासाठी चाललेली धडपड, बऱ्याच वर्षांनी भेटलेल्या मित्र-मैत्रिणींच्या कॉलेज जीवनातील रंगलेल्या आठवणी, गमती-जमती असा माहौल शिवाजी विद्यापीठात पाहायला मिळाला.

**योग्य नियोजनामुळे प्रमाणपत्र वितरण झाले सोपे**

परीक्षा भवन क्रमांक दोन येथील आवारात पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याची सोय केली होती. यंदा प्रथमच पदवी प्रमाणपत्रात मराठी व इंग्रजी या दोन भाषांचा समावेश करण्यात आला आहे. परीक्षा विभागाने येथे स्नातकांच्या सोयीसाठी ५० बूथ उभारले होते. शाखानिहाय प्रमाणपत्रे वितरित करण्याची सोय असल्यामुळे संपूर्ण परिसर स्नातकांनी तुडुंब भरला होता. यंदा ज्या बूथवर प्रमाणपत्र मिळणार त्याचा क्रमांक विद्यार्थ्यांना मोबाईल मेसेजद्वारे मिळत असल्याने कुठेही रांग किंवा गर्दी दिसत नव्हती. प्रमाणपत्र घेतल्यानंतर त्यातील मजकूर पाहण्याची उत्कंठा शिगेला पोहोचली होती. विद्यापीठाने दिलेले मानवस्त्र परिधान करून आणि प्रमाणपत्र उंचावून अनेकांनी हा क्षण अक्षरशः साजरा केला. पदवी प्रमाणपत्र स्वीकारल्यानंतर विद्यार्थ्यांनी विद्यापीठ आवाराची सैर केली.

**आई-वडिलांच्या साक्षीने पदवीचा आनंद**

पदवी प्रमाणपत्रे स्वीकारण्यासाठी अनेकजण कुटुंबीयांसह आले होते. उच्च पदवीधर झालेल्या विवाहित विद्यार्थिनींसोबत त्यांचे पती, मुले यांचीही उपस्थिती होती. बहुतांशी विद्यार्थिनी आई आणि मुलगीसोबत आल्या होत्या. मुरगूडच्या सीमा पाटीलसोबत आलेले थोरल्या फेटधारी आजोबा आणि नऊवारी साडीतील आजी, नात पदवी घेतानाचा आनंद पाहून भारावलेले परीक्षा भवन, मुख्य इमारतीसमोरील बगीचा, ग्रंथालय येथे गर्दी होती. मुख्य इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोर स्नातक पदवी प्रमाणपत्रासह छायाचित्र काढून घेत होते.

**घाटगे बापलेकीला मिळाली एकत्र एलएलबीची पदवी**

कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष अनिल घाटगे व त्यांची कन्या ऋतुजा घाटगे या दोघांनी एलएलबी (स्पेशल) ही डिग्री एकाच वेळी प्राप्त केली. अनिल घाटगे यांनी यापूर्वी चार डिग्री संपादित केल्या असून नुकतीच त्यांना एलएलबी स्पेशल ही पाचवी डिग्री मिळाली. ऋतुजा ही एलएलबी स्पेशल परीक्षेमध्ये विद्यापीठात दुसरी आली आहे. प्रत्येक वर्षी तिला शिवाजी विद्यापीठाची मेरिट स्कॉलरशिप मिळाली आहे. अनिल घाटगे हे शैक्षणिक क्षेत्रात गेली तीस वर्षे कार्यरत आहेत. ते शिवाजी विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्यदेखील आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभानंतर पदवी प्रमाणपत्र घेण्यासाठी झालेली गर्दी.

> “ मी ऑर्गेनिक केमिस्ट्री विषयातून एमएस्सी पदवी घेतली. इचलकरंजीच्या डीकेएएससी महाविद्यालयातून मी शिक्षण पूर्ण केले. यंदा द्विभाषिक पदवी प्रमाणपत्र असल्याचा वेगळा आनंद आहे. विद्यापीठाच्या आवारात येऊन प्रत्यक्ष पदवी प्रमाणपत्र घेण्याचा आनंद काही वेगळाच आहे. हा अनुभव देणारा क्षण आहे.
>
> - प्रतीक्षा शिंदे, विद्यार्थिनी

### ड्रेसकोड, ट्रेनिंगने वेधले लक्ष

विद्यार्थी ड्रेसकोड, ट्रेनिंग करून कॅम्पसमध्ये आले होते. काही मुलींनी मोती रंग, पांढऱ्या, पेस्टल रंगाच्या साड्या, ड्रेस परिधान केले होते. मुलांनी कुर्ता, कुणी पांढरे शर्ट - काळी पँट असा पेहराव केला होता. एमबीएच्या विद्यार्थ्यांनी युनिफॉर्म परिधान करून पदवी स्वीकारली. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांनी काळा कोट परिधान करून पदवीचा आनंद साजरा केला. एकसारख्या ड्रेसकोडमधील विद्यार्थी लक्ष वेधून घेत होते. काही युवती ग्रुपने जीपमधून आल्या होत्या.

### ७६ वर्षीय वसंत सिंघन यांना पीएचडी

वसंत सिंघन यांनी वयाच्या ७६ व्या वर्षी पीएचडी पदवी संपादन केली. संशोधनाच्या आवडीतून त्यांनी प्रबंध सादर केला होता. शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षांत समारंभात सिंघन यांनी पीएचडी पदवी प्रमाणपत्र घेत शिक्षणाला वयाचे बंधन नसते हे दाखवून दिले.

18 JAN 2025
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आव्हानांना तोंड देणारे विद्यार्थी तयार करणे आवश्यक

## राज्यपाल राधाकृष्णन यांचे आवाहन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** शिक्षणाने प्रामाणिकपणा, करुणा आणि टीकात्मक विचारसरणीसारखे गुण जोपासले पाहिजेत. विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार केले पाहिजे. शिवाजी विद्यापीठ शिक्षणाच्या समग्र दृष्टिकोनातून या तत्वज्ञानाचे उदाहरण देते, असे मत राज्यपाल तथा कुलपती, सी.पी. राधाकृष्णन यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केले.



राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते बंडू कोळी यास राष्ट्रपती सुवर्णपदक प्रदान करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षांत सोहळ्यावेळी ते बोलत होते. कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांनी स्वागत केले.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, आधुनिक भारताच्या प्रगतीसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. धोरणाचे लाभ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र शासन जोमाने काम करीत आहे.

राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे संचालक, ज्येष्ठ रसायनशास्त्रज्ञ डॉ. आशिष लेले यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवावा, यशाला गवसणी घाला, असा संदेश दिला. आभार प्रदर्शन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी मानले.

18 JAN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फेटा, सेल्फी अन् पदवी प्रमाणपत्र

## शिवाजी विद्यापीठात उत्साही वातावरण; पारंपरिक वेशात विद्यार्थ्यांचा सहभाग

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाचे पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्र हाती पडताच, विद्यार्थ्यांचे चेहरे खुलले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ छायाचित्र घेण्याची प्रत्येकाची उत्सुकता दाटून आली. राज्यपालांच्या सुरक्षिततेसाठी कडेकोट सुरक्षा व्यवस्थेमुळे पुतळ्याकडे जाण्याचा मार्ग बंद. छायाचित्र कधी घ्यायचे, या विचारात अस्वस्थ विद्यार्थ्यांचा ग्रंथालयासमोर दोन-तीन तास ठिय्या. दीक्षान्त सोहळा झाल्यानंतर राज्यपालांच्या गाड्यांचा ताफा प्रवेशद्वाराबाहेर गेला अन् शिवरायांच्या पुतळ्याचा परिसर विद्यार्थ्यांच्या गर्दीने अक्षरशः गजबूजन गेला. मग, डोक्यावर फेटा बांधून छायाचित्रे टिपण्यात विद्यार्थी दंग झाले.**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पदवी मिळविलेल्या विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशात सेल्फी घेऊन असा आनंद व्यक्त केला. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

विद्यापीठाचा आज ६१ वा दीक्षान्त सोहळा. त्यासाठी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची सकाळी साडेनऊपासून विद्यापीठात हजेरी. दुचाकी, तीनचाकी, चारचाकीसह केएमटी व एस.टी.ने विद्यार्थी आले होते. सोहळा अकरा वाजता सुरू झाला अन् विद्यार्थ्यांच्या गर्दीने परिसर गजबजून गेला. परीक्षा भवन क्र. २ च्या परिसरात अभ्यासक्रमनिहाय पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्रांचे वितरण केले जात होते. तेथे विद्यार्थी-विद्यार्थिनींची झुंबड उडाली होती. कार्यक्रम सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांची छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याच्या परिसरात जाऊन छायाचित्र टिपून घेण्याची लगबग सुरू झाली. राज्यपालांसाठी असलेल्या सुरक्षेमुळे सुरक्षारक्षक त्यांना मुख्य इमारतीसमोर येऊ देत नव्हते. त्यामुळे ग्रंथालयासमोर हजारो विद्यार्थ्यांनी ठिय्या मारला होता. राज्यपाल कार्यक्रम आटोपून विद्यापीठातून बाहेर पडले आणि सुरक्षा व्यवस्था शिथिल झाली. विद्यार्थ्यांनी लगेच पुतळ्याच्या दिशेने धाव घेतली. डोक्याला फेटा बांधून काहींचे फोटोसेशन सुरू झाले. मोबाईलवर ग्रुपने सेल्फी घेण्यात काही विद्यार्थी व्यस्त झाले.

### इंग्रजी, मराठी भाषेत प्रमाणपत्र

■ यंदा प्रथमच पदवी व पदव्युत्तर प्रमाणपत्र इंग्रजी व मराठी भाषेत विद्यार्थ्यांच्या हाती सोपविण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांसह त्यांचे कुटुंबीय त्यात काही चुका तर राहिल्या नाहीत ना, याची खातरजमा करून घेत होते. विशेष म्हणजे कार्यक्रमानंतर राजमाता जिजाऊ सभागृहात विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्र हातात घेऊन छायाचित्रे घेतली.

### दृष्टिक्षेपात

■ राज्यपालांच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी विद्यापीठाबाहेरील चहाच्या टपऱ्या बंद.

■ दुपारी एकनंतर छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर गजबजला.

# पुण्य नगरी

कोल्हापूर । शनिवार १८ जानेवारी २०२५

कुपन पुण्यनगरी दि. १८.०१.२०२५




# 'यंग ब्रिगेड'च्या आनंदाला उधाण

## शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत समारंभ उत्साहात

कोल्हापूर : प्रतिनिधी

प्रदीर्घ काळानंतर विद्यापीठाच्या परिसरात मित्र-मैत्रिणींशी झालेली भेट, त्यांच्यासोबत केलेल्या गप्पा, पदवी प्रमाणपत्र मिळाल्याचा ओसंडून वाहणारा आनंद आणि दीक्षांत पोशाख परिधान करून शिवछत्रपतींच्या ऐतिहासिक पुतळ्यासोबत फोटो घेताना वाटणारा अभिमान, अशा उत्साही वातावरणात शिवाजी विद्यापीठाचा ६१ वा दीक्षांत समारंभ शुक्रवारी पार पडला.

गेल्या काही दिवसांपासून शिवाजी विद्यापीठाचा परिसर या दीक्षांत सोहळ्यासाठी सज्ज होता. [illegible]



[illegible]



### अविस्मरणीय क्षण कॅमेराबद्ध

मित्र-मैत्रिणींसोबत पदवी प्रमाणपत्र स्वीकारलेला दिवस हा विद्यार्थी जीवनातील अविस्मरणीय दिवस. [illegible]



### यांचा झाला सन्मान

[illegible]



### ऑनलाईन पद्धतीने दोन हजारांहून अधिक जणांचा सहभाग

शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षांत समारंभाचे [illegible]

# पदवी प्रमाणपत्रे डिजिलॉकरवर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या शुक्रवारी झालेल्या ६१ व्या दीक्षांत समारंभात प्रदान करावयाची सर्व ५१,४९२ पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभ होताच नॅशनल ॲकॅडेमिक डिपॉझिटरी पोर्टलवर कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते अपलोड करण्यात आली. यामध्ये पोस्टाद्वारे पाठवावयाच्या पदवी प्रमाणपत्रांचाही समावेश आहे.

दीक्षांत समारंभ संपल्यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते डिपॉझिटरीवर पदवी प्रमाणपत्रे अपलोड करण्याचा कार्यक्रम व्यवस्थापन परिषद सभागृहात झाला. कुलगुरूंनी एका माऊस क्लिकद्वारे ऑनलाईन पद्धतीने ही प्रमाणपत्रे अपलोड केली व आता ती पदवीधारकांना उपलब्ध झाल्याची घोषणा केली. विद्यापीठाचा परीक्षा विभाग व संगणक केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने यासाठी सन २०२० पासून काम सुरू आहे. विद्यापीठात २०२० मध्ये नॅशनल ॲकॅडेमिक डिपॉझिटरी कक्ष सुरू झाला. या कक्षामार्फत सन २००१ ते २०२४ या कालावधीतील (३७ वा ते ६० वा दीक्षांत समारंभ) पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांची १०,०३,१९० इतकी प्रमाणपत्रे एनएडी पोर्टलवर अपलोड केली आहेत.

# बाप-लेक एकाच वेळी एलएल.बी.

कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष अनिल घाटगे व त्यांची कन्या ऋतुजा घाटगे दोघांनी एलएल. बी. (स्पेशल) ही पदवी प्राप्त केली. अनिल घाटगे यांनी आतापर्यंत चार पदव्या संपादित केल्या असून, नुकतीच त्यांना एलएल.बी. स्पेशल ही पाचवी पदवी मिळाली. त्यांची कन्या ऋतुजा ही एलएल.बी. स्पेशल परीक्षेमध्ये विद्यापीठात दुसरी आली आहे. अनिल घाटगे हे विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्यदेखील आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2025
तरुण भारत

# बाप-लेक एकाचवेळी एलएलबी पदवीधर

## घाटगे शैक्षणिक शेत्रात ३० वर्षे कार्यरत





**वाकरे :** कोल्हापूर जिल्हा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष अनिल घाटगे व त्यांची कन्या ऋतुजा अनिल घाटगे या दोघांनी एकाच वेळी एलएलबी (स्पेशल) ही पदवी प्राप्त केली आहे.

अनिल घाटगे यांनी आत्तापर्यंत चार डिग्री संपादित केल्या असून नुकतीच त्यांना एलएलबी स्पेशल ही पाचवी डिग्री मिळाली आहे. सध्या ते एम ए राज्यशास्त्र प्रथम वर्षात शिकत असून त्यांनी नुकतीच फर्स्ट सेमिस्टर ही परीक्षा देखील दिली आहे. त्यांची कन्या ऋतुजा घाटगे ही पहिलीपासून आतापर्यंत फर्स्ट क्लास विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाली असून एलएलबी स्पेशल परीक्षेमध्ये ती विद्यापीठात दुसरी आली आहे.

प्रत्येक वर्षी तिला शिवाजी विद्यापीठाची मेरिट्स स्कॉलरशिप मिळाली आहे. अनिल घाटगे ह शैक्षणिक क्षेत्रात ३० वर्षे कार्यरत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर वेळोवेळी आवाज उठवला आहे. ते शिवाजी विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य देखील आहेत.

पुण्य नगरी

# विद्यापीठ ग्रंथ महोत्सव यंदा विस्तार इमारत परिसरात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणारा ग्रंथ महोत्सव या वर्षापासून मुख्य प्रशासकीय इमारत आणि विस्तार (अनेक्स) इमारत यांमधील मोकळ्या प्रांगणात १६ व १७ जानेवारी २०२५ असा दोन दिवस भरविण्यात येणार आहे, अशी माहिती बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक तथा ग्रंथ महोत्सव समन्वयक डॉ. धनंजय सुतार यांनी दिली आहे.

ग्रंथ महोत्सवासाठी होणाऱ्या गर्दीमुळे बागेमधील झाडांना इजा पोहोचू नये, यासाठी या वर्षीपासून तो विस्तार (अनेक्स) इमारतीच्या प्रांगणात भरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार, शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षांत समारंभानिमित्त सलग १८ व्या वर्षी "ग्रंथमहोत्सव २०२५"चे आयोजन दि. १६ ते १७ जानेवारी २०२५ या कालावधीत करण्यात आले आहे. महोत्सवात नामवंत भारतीय तसेच विदेशी कंपन्यांचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकेज, डिजीटल ग्रंथ वितरक सहभागी होणार आहेत.

ग्रंथ महोत्सवाच्या निमित्ताने १६ जानेवारी रोजी सकाळी ७.३० वाजता ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत ग्रंथपालखीच्या पूजनाने दिंडीचे उद्घाटन होईल. दिंडीनंतर सकाळी १० वाजता ग्रंथ महोत्सवाचे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येईल. सदर ग्रंथ महोत्सवानिमित्त आयोजित ग्रंथ दिंडी तसेच सांस्कृतिक कार्यक्रम यामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. धनंजय सुतार यांनी केले आहे.

लोकमत
कोल्हापूर, शनिवार, दि. १८ जानेवारी २०२५

# विद्यापीठात अवलियांनी गाजविला दीक्षांत समारंभ

## आर्किटेक्चर इंजिनिअरिंगमध्ये प्रतिष्ठेची डॉक्टरेट

काणकोण गोवा येथील आर्किटेक्चर आणि पर्यावरण नियोजन क्षेत्रातील दिग्गज अभियंता डॉ. गौतम देसाई यांना शिवाजी विद्यापीठाकडून आर्किटेक्चर इंजिनिअरिंगमध्ये प्रतिष्ठेची डॉक्टरेट पदवी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान केली. डॉ. देसाई सध्या मडगावात वास्तव्य करतात. त्यांनी आर्किटेक्चरमध्ये पदवी, व्हॅल्युएशन आणि पर्यावरणीय आर्किटेक्चरमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. डॉ. देसाई हे भारत सरकारच्या पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाने नेमलेल्या गोवा राज्य तज्ज्ञ मूल्यांकन समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहतात. देसाई हे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्सचे फेलो, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटेरियर डिझायनर्सचे आजीवन सदस्य, तसेच रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड सर्व्हेयर्स, लंडनचे मान्यताप्राप्त सदस्य आहेत. त्यांनी गुजरात येथील सरदार विद्यापीठाकडून सुवर्णपदक मिळविले आहे.



“ इतिहास विषयात पदवी मिळवण्याची अनेक वर्षांपासून इच्छा होती, ती दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रामुळे पूर्ण झाली. वयाच्या ८० व्या वर्षी शिवाजी विद्यापीठाच्या ६१ व्या दीक्षांत समारंभात ही पदवी मला मिळाली.

**- वसंत ज्ञानू सिंगण**, बांबवडे.



“ माझ्या उल्लेखनीय कारकिर्दीतील हा समारंभ आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे. या सन्मानामुळे संपूर्ण वास्तुकला समुदायाला प्रेरणा मिळाली आहे. दूरदर्शी व्यक्तिमत्त्व म्हणून माझी ओळख पक्की केली आहे.

**- गौतम देसाई**, मडगाव, गोवा

18 JAN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ८१ वर्षाचा 'तरुण' उच्च पदवीधर

## वसंत ज्ञानू सिंघण यांनी घेतली एम. ए. ची पदवी : बांबवडेत रेडिओ दुरुस्ती, मोडी लिपी तज्ज्ञ

सुधाकर काशिद
कोल्हापूर

साठ पासष्ठ वय झालं की आता फक्त आराम करत घरात बसून राहायचं. तब्येत चांगली ठेवण्यासाठी वेगवेगळे प्रयोग करत राहायचं किंवा आपल्या नोकरी धंद्यातल्या काळातलं तेच ते प्रत्येकाला सांगत बसायचं. हीच निवृत्तीनंतर बहुतेकांची दैनंदिनी झालेली असते पण याला काही अपवाद नक्कीच आहे. त्यातलेच एक वसंत काका वय ८१ पण, शुक्रवारी चक्क शिवाजी विद्यापीठात पदवीदान समारंभाला जाऊन ते एम. ए. ची पदवी घेऊन आले आणि तुमच्या हौसेला वयाची अट अजिबात नसते हे साऱ्या जगाला सांगून गेले. तरुणाईच्या गर्दीतही आपल्या विजार शर्ट गांधी टोपीचे वेगळेपण त्यांनी दाखवले.

वसंत ज्ञानू सिंघण शाहूवाडी तालुक्यातल्या सुपात्रे गावचे. १९६२ साली बांबवडेच्या गांधी विद्यालयातून मॅट्रिक (अकरावी) पास झाले. त्यावेळी नोकऱ्या सहज मिळायच्या. वसंत काकांनाही मिळाली पण नोकरीत



त्यांचे मन रमले नाही. मुंबईला जाऊन रेडिओ दुरुस्तीचे काम शिकून आले व बांबवडे येथे ज्योती रेडिओ रिपेरियर्स हे दुकान उघडले. त्यावेळी मोठ्या आकाराचे रेडिओ होते. लोक डोक्यावरून रेडिओ दुरुस्तीसाठी घेऊन यायचे आणि वसंत काका दुरुस्त करून द्यायचे.

पण रेडिओचा सूर जुळवता जुळवता त्यांना वाचनाचा म्हणजेच नवे काहीतरी ज्ञान आत्मसात करण्याचा छंद लागला. रेडिओचे काम करत करत ते वाचन अध्ययन करत राहिले. मोडी भाषेत तर तज्ज्ञ झाले.

### ज्याच्या पाठीचा कणा ताठ त्याचे आरोग्य चांगले यावर विश्वास

मी ८१ व्या वर्षी पदवी घेतली यात फार काही मोठे केलेले नाही. थोडी जिद्द बाळगली तर प्रत्येक जण वय कितीही वय असो नवे ज्ञान घेऊ शकतो. जन्मतारखेवरून माझे वय ८१. पण मी त्याकडे लक्ष देत नाही. आता थांबायचं विश्रांती घेत बसायचं असला विचारही माझ्या मनात येत नाही. या वयातही उत्साह टिकायला मी साधेच जेवण घेतो. रोज एक तासभर मांडी घालून शांत बसतो. ज्याच्या पाठीचा कणा ताठ त्याचे आरोग्य चांगले यावर माझा विश्वास आहे.

– वसंत ज्ञानू सिंघण

कोणताही मोडी भाषेतला कागद असो वसंत काका तो वाचू लागले. सरकारी कामकाजात तर वसंत काकांना कायम बोलावणे येत राहिले. कोर्टातही मोडी कागदाचे जबाबदार साक्षीदार म्हणून त्यांना बोलवले जाऊ लागले. ते हे करत करत बीए झाले आणि दोन वर्षांपूर्वी एम. ए. साठी त्यांनी फॉर्म भरला. मनापासून अभ्यास केला. परीक्षा केंद्रात परीक्षा द्यायला गेले. सगळेजण त्यांना बघतच राहिले. दोन–तीन वेळा त्यांची रिसीट तपासली गेली. या वयातला माणूस परीक्षा द्यायला येतो याची खातरजमाच करण्यात आली.


अर्थात ते एम. ए. इतिहास ही परीक्षा सहज पास झाले. पदवीदान समारंभात पदवी न्यायला कोल्हापुरात आले. रांगेत उभे राहिले. अनेकांना वाटले ते आपल्या नातवाच्या पदवीदान समारंभाला आले असतील पण वसंत काका पदवी प्रमाणपत्र हातात घेऊन विद्यापीठातील तरुणाईत मिसळले. टोपी आणि गाऊन परिधान केलेल्या जल्लोषी तरुणाईच्या गर्दीतही आपला विजार शर्ट, टोपी, कपाळावर टिळा ही आपली वेगळी ओळख त्यांनी जपली. ते पदवी घेण्यासाठी एकटेच आले होते. एकटेच रात्री एसटीने बांबवड्याला पदवी घेऊन गेले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2025


तरुण भारत


# वसुंधरा चित्रपट महोत्सव २१ पासून

- शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विभागात तीन दिवस आयोजन
- ५० हून अधिक लघुपटाचे होणार सादरीकरण
- पर्यावरण विषयक होणार जनजागृती : वसुंधरा पुरस्काराचे होणार वितरण


डॉ. एस. आर. यादव


डॉ. अनिलराज जगदाळे


प्रा. नागेश दप्तरदार


अमोल बुढे

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभाग व किर्लोस्कर उद्योग समूह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला मंगळवार, २१ रोजी पासून सुरुवात होणार आहे, अशी माहिती पर्यावरणशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. आसावरी जाधव, सीएसआर प्रमुख शरद आजगेकर यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. २३ जानेवारीपर्यंत शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहात या महोत्सवाचे आयोजन केले असुन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपटाच्या माध्यमातून पर्यावरण विषयक जागृतीसह पर्यावरणाच्या स्थानिक प्रश्नांना हाताळण्यासाठी महोत्सवाचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. जाधव म्हणाल्या, 'सकस अन्न, समृद्ध निसर्ग आणि आरोग्यपूर्ण समाज" हे फेस्टिवलमधील प्रमुख विषय आहेत. २१ रोजी सकाळी १०.३० वाजता महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. ५० हून अधिक लघुपट दाखवण्यात येणार असून सर्वांसाठी मोफत प्रवेश आहे. सकाळी ११ सायंकाळी ५:३० या वेळात चित्रपट प्रदर्शित होणार आहेत.

आजगेकर म्हणाले, चित्रपटांसोबतच महोत्सवामध्ये विविध विषयांवर चर्चासत्रे, क्षेत्र भेटी, फोटोग्राफी प्रदर्शन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. विद्यापीठातील निसर्ग, शहरी पर्यावरणीय समस्या, पश्चिम घाट आणि शहरातील वन्यजीव विषयांवर फोटो व रिल्स स्पर्धेचे आयोजन केल्याचे सांगितले. यावेळी डॉ. रसिया पडळकर, किर्लोस्करतर्फे एचआर हेड हरीश सैवे, सिनिअर जनरल मॅनेजर व्ही. एम. देशपांडे, मोहन तायडे उपस्थित होते.

### वसुंधरा पुरस्कार असे

- वसुंधरा सन्मान : डॉ. एस. आर. यादव
- वसुंधरा गौरव : डॉ. अनिलराज जगदाळे
- वसुंधरा मित्र : प्रा. नागेश दप्तरदार
- वसुंधरा मित्र : अमोल बुढे
- वसुंधरा मित्र : संपूर्ण अर्थ लाईव्हलीहूड फाउंडेशन

### महोत्सवातील कार्यक्रम असे

२१ रोजी दुपारच्या सत्रात 'कचरा व्यवस्थापन' या विषयावर प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन. सायंकाळी ६ वाजता 'निसर्गायन' या निसर्गविषयक कविता व गाण्यांचा कार्यक्रम सादर होईल. २२ रोजी दुपारच्या सत्रात 'साकारु शाश्वत शहरे' या विषयावर चर्चासत्र. सायंकाळी ६ वाजता 'स्टेंड अप कॉमेडीचे' आयोजन केलेले आहे. २३ रोजी सकाळी ८ वाजता विद्यापीठातील बोटॅनिकल गार्डन येथे अभ्यास भेटीचे आयोजन. दुपारी ३ वाजता किर्लोस्कर वसुंधरा पुरस्कारांचे वितरण होणार आहे.